महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त कार्यरत गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी-१२) अंतर्गत खातेहनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाकरीता जिल्हा वाटप करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन आदेश क्रमांक: मबाआ-२०२५/प्र.क्र.४१/का-७ अ
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- ६ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-
१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय,क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र८४/१३/१२-अ, दि.२०.१.२०१४,
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.: टिआरएन-०४२४/प्र.क्र.३७/प्रशि-१, दि.१.८.२०२५,
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दिपत्रक क्र.: टिआरएन-०४२४/प्र.क्र.३७/प्रशि-१, दि.१२.९.२०२५,
४. सामान्य प्रशासन विभाग यांचे कार्यालयीन आदेश क्र. टिआरएन-०६२६/प्र.क्र.२४/प्रशि-३, दि.२८.७.२०२६.

शासन आदेश :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परिक्षेव्दारे सरळसेवेने नियुक्त होणा-या गट-ब (राजपत्रित) संवर्गातील पदांसाठी सन २०१४ पासून वनामती, नागपूर या संस्थेमार्फत दोन वर्षाच्या कालावधीसाठी एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम वाचा क्र.१ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र. ४ येथिल आदेशान्वये महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त कार्यरत गट-ब (राजपत्रित) संवर्गामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा (मुख्य) परिक्षा २०२२ च्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी-१२) अंतर्गत खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी रूजू होण्याकरीता विभाग स्तरावरुन आदेश निर्गमित करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.४ येथिल दि.२८.७.२०२६ रोजीच्या शासन आदेशातील तरतुदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा (मुख्य) परिक्षा -२०२२ च्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या महिला व बाल विकास विभागाच्या गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील परिविक्षाधिन अधिकाऱ्यांना एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी-१२) अंतर्गत खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी रूजू होण्याकरीता खालीलप्रमाणे महसूल विभाग व जिल्हा वाटप करण्यात येत आहे.

अ.क्र.	परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांचे नाव	मूळ जिल्हा	प्रस्तावित महसूली विभाग व जिल्हा	
			महसूली विभाग	जिल्हा
१	श्रीमती शर्वरी अजय संगवई	अकोला	पुणे	पुणे

३. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ येथिल शासन निर्णय व संदर्भ क्र.३ च्या शुध्दिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण कालावधीतील मूल्यमापन व पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता उपायुक्त (प्रशासन), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना नोडल अधिकारी घोषित करण्यात येत आहे. नोडल अधिकारी यांनी सदर परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांना जिल्हा संलग्नतेदरम्यान देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाबाबत नियोजन करुन त्यानुसार संबंधित परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना दि.१०.८.२०२६ (म.पू.) रोजी त्यांना वाटप करण्यात आलेल्या जिल्ह्यात रुजू करुन घेण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच, ज्या कार्यालयातील कार्यकक्षेत संबंधित अधिकारी प्रशिक्षण घेत असतील त्या जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी/ जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक), जिल्हा परिषद यांनी परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण कालावधीत मुल्यमापन अहवाल समन्वय अधिकारी म्हणून तयार करुन नोडल अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करावा.

४. सदरहू परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांनी खाली नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रशिक्षण कालावधीमधील खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य आहे.

१) परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांने संदर्भ क्र.४ येथिल सामान्य प्रशासन विभागाच्या नियुक्ती आदेशातील सर्व अटी लागू राहतील तसेच सदर अटींची पूर्तता करणे अनिवार्य आहे.

२) सर्वसाधारणपणे राज्यसेवा गट-ब च्या अधिकाऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने विहीत केलेले इतरही नियम या परिविक्षाधीन अधिकाऱ्यास लागू असतील व त्या नियमांचे पालन करणे त्यांना बंधनकारक राहील.

३) प्रशिक्षण कालावधीत परिवीक्षाधीन अधिकारी यांनी त्यांची दैनंदिन रोजनिशी ठेवावी व ती अद्ययावत करावी.

४) ज्या जिल्हयातील कार्यालयात परिवीक्षाधीन अधिकारी कार्यरत आहेत त्या कार्यालयाच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी/ जिल्हा कार्यक्रम अधिकारी(मबाक), जिल्हा परिषद यांनी सदर परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवावे तसेच, त्यांनी केलेल्या कामकाजाचे मुल्यमापन करावे. संबंधित प्रशिक्षणार्थी उमेदवारांचा प्रत्येक महिन्याचा प्रशिक्षण अहवाल प्रमाणीत करुन नोडल अधिकारी तथा उपायुक्त(प्रशासन), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करावा.

५) प्रशिक्षण कालावधीत परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांनी गैरवर्तन केल्याचे अथवा विहित प्रशिक्षण पुरेशा गांभीर्याने घेत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी/ जिल्हा कार्यक्रम अधिकारी(मबाक), जिल्हा परिषद यांनी नोडल अधिकारी यांना यांचेकडे विनाविलंब पाठवावा. तसेच, सदर गैरवर्तनाची नोंद संबंधितांच्या वैयक्तिक सेवा अभिलेखात घेण्यात यावी.

६) प्रशिक्षणासाठी निश्चित करुन दिलेल्या जिल्हयात रुजू झाल्यानंतर त्याबाबतचा अनुपालन अहवाल परिवीक्षा अधिकारी यांनी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी/ जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक), जिल्हा परिषद यांचेमार्फत नोडल अधिकाऱ्यांकडे सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०६११४००४२१३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2026.08.06 11:57:56 +05'30'

(वि.रा.ठाकूर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रत-

१. महालेखापाल, महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर (लेखापरीक्षा /लेखा व अनुज्ञेयता),
२. आयुक्त, महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई,
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद,पुणे,
५. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे,
६. संचालक (सीपीटीपी), वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन, प्रशिक्षण संस्था, नागपूर
७. सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास,
८. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
९. सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक), जिल्हा परिषद,
१०. संबंधित अधिकारी (मार्फत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे),
११. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१२. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
१३. सामान्य प्रशासन विभाग (प्रशि-३) मंत्रालय,मंबई,
१४. निवड नस्ती (७-अ).